http://www.epitomejournals.com, Vol. II, Issue III, March 2016, ISSN: 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research

# सांगा, तुम्हीच सांगा : एक समीक्षा



**Shrikrushna Sabbalsing Parihar**
Assistant Professor of Political Science
Sant Dnyaneshwar Mahavidyalaya, Soegaon,
Dist. Aurangabad (MS), India
Email : shrisparihar@gmail.com

सांगा, तुम्हीच सांगा... हे डॉ.प्रमोद पवार यांचे साक्षात प्रकाशन, औरंगाबाद यांनी २०१३ साली प्रकाशित केलेले स्त्रीभ्रूण हत्येवरील दीर्घ काव्य आहे. डॉ. प्रमोद पवार यांनी आपल्या दीर्घ काव्यातून समाजातील स्त्री सारख्या महत्त्वाच्या घटकाचे जीवन जन्माला येण्याअगोदरच नाकारले जाते. या प्रश्नासबंधीची मांडणी केली आहे. हे दीर्घ काव्य म्हणजे एक जन्म घेऊ इच्छीणारे स्त्री अर्भक आपल्या आई –वडिलांना तुम्ही मला जन्माला येण्याअगोदर मारू नका अशी आर्तसाद घालते.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

या काव्यावर विविध समीक्षकांनी वेगवेगळ्या आयामातून समीक्षा केली आहे. परंतु प्रस्तुत समीक्षणात्मक संकलनामध्ये प्रसिध्द साहित्यिक फ.मुं. शिंदे, कवी पी.विठ्ठल, प्राचार्य डॉ. राजेश यादव, यशवंतराव चव्हाण युवा प्रतिष्ठानचे शं. ग. काळे, प्रा. श्रीकृष्ण परिहार यांच्या निवडक समीक्षेचा समावेश केला आहे.

**फ.मुं. शिंदे :**

'असून नसल्यापेक्षा नसून असणं' या अंगभूत अधिष्ठानातलं आत्मीय आध्यात्म जोखून जन्माच्या जगराहटीचा भूमिगत असा हा संवाद आहे; जग पाहू इच्छीणाऱ्या जीवानं जगाशी केलेला हा मुक्त संवाद आहे. जगाच्या भरोशावर जीवाला जगता येत नाही हा इतिहास जगजाहीर आहे; जगण्याच्या आणि जन्माच्या जीवावर उठणं हा भूगोल इतका भयभीत करणारा आहे की भूमीनच बंड करून उठावं. ही कोणती गर्भश्रीमंती की स्त्रीनं गर्भगळीत व्हावं; "या इथे कुठे कुठे, आसवांना खंड नाही, या इथे कुठे कुठे, विस्तवात बंड नाही", ही इथल्या वेदनेची कहाणी आहे. त्या कहाणीच्या आणि त्या करुणेच्या काठानं वाहणारा हा संवाद खोलातून वर उफाळून आलेला आहे.

स्त्रीभ्रूणहत्या ही मानसिकता आहे; मनाची नाही, मनूची ! म्हणूनच ' सांगा, तुम्हीच सांगा ....' हा गर्भ श्वासातला कोवळा प्रश्न फार जरठ आणि जिवंत आहे. प्रमोद पवार यांनी समाजाला तसेच समस्येला उद्देशून केलेल्या या संवादाचा सारांश,

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

'ओशो' च्या भाषेत असा आहे की, *"Women is capable of producing life, man is not."*

**डॉ.पी.विठ्ठल :**

'सांगा, तुम्हीच सांगा...' हा कवितारुपी स्त्री भ्रूणहत्येचा दीर्घ संवाद वाचला. समाजातील एका दाहक विषयावर आपण केलेले काव्यमय भाष्य खूपच महत्त्वाचे आहे. विशेषतः एखाद्या विषयावर दीर्घ कविता लिहिणे ही गोष्ट अत्यंत अवघड असते. विषयसूत्र सुटू न देता सलगपणे अनुभव मांडणे ही जबाबदारी ची बाब असते तथापि आपण हा विषय अत्यंत साध्या आणि सुलभ भाषेत मांडला आहे. कृत्रिम प्रतीमांच्या मोहात न पडता या सामाजिक विषयावरचे आपले भाष्य वाचकाला अस्वस्थ करणारे असेच आहे. विषेशत: या पूर्वीच्या दोन्ही काव्यसंग्रहापेक्षा ही कविता अधिक सकस आहे.

**श. गं. काळे :**

लोकसंख्येतील स्त्री – पुरुष यांच्या प्रमाणात संतुलन राखणे हे समाज स्वास्थाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. हे संतुलन बिघडविणारे जे अनेक घटक आहेत, त्यापैकी स्त्री भ्रूणहत्या हा लक्षणीय घटक आहे. दुर्दैवाने यासाठी आधुनिक तंत्रज्ञानातील अद्ययावत सुधारणांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला जात आहे. अशा स्थितीत डॉ. प्रमोद पवार यांनी स्त्री जन्माचे महत्त्व दीर्घ कवितेच्या रुपात आर्ततेने मांडले आहे त्याचा समाजावर सकारात्मक परिणाम होईल असे वाटते.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

**डॉ. राजेश यादव :**

सांगा, तुम्ही सांगा .... ही डॉ. प्रमोद पवार यांची दिर्घ कविता अनुभवली. ही कविता अतिशय सुंदर आहे. तुम्ही फक्त सुंदर शब्द बोलला आहात. तुमची कविता ही नुसतीच कविता नाही. शब्दांची नुसतीच सुंदर रचना नाही, तिच्यात गहन अर्थ भरलेला आहे आणि ती वास्तवतेकडे, सत्याकडे अंगुलीनिर्देश करते.आपली कविता म्हणजे मनोरंजन नसून आत्मभान आहे. आजच्या काळात सार्थ व समर्पक अर्थपूर्ण असे आपले शब्द आहेत. आज ते शब्द प्रतीकात्मक न वाटता पूर्णतः वस्तूस्थिती निदर्शक असे आहेत.

जीवनात चिंता आहेत पण चिंतातूर होण्याची आवश्यकता नाही. कारण चिंतातूर होणं हे चिंतावर नव्हे तर त्या विषयीच्या आपल्या दृष्टीकोनावर अवलंबून आहे. म्हणून ‘ चिंतातूर व्यक्तिमत्त्व ’ ही देखील आपलीच निवड आसते. असं नाही की ‘अचिंतातूर’ व्यक्तिमत्त्वाबाबत चिंता नसतात. चिंता तर असतातच कारण ते तर जीवनाचं अपरिहार्य अंग आहे. पण त्या लेवून न बसता आपण त्यांच्या पलीकडे पाहू शकता. सांगा, तुम्हीच सांगा .. या दीर्घ कवितेच्या अभिव्यक्तीतून तुम्ही पाहिलं, तुमची दृष्टी उगवत्या सूर्याकडे लागली. म्हणून तुमचा आत्मा काळोखात बुडू शकणार नाही. शरीर बुडेलच, तुमची कविता संवेदनयुक्त प्रेमातून जन्मलेली कविता आहे. प्रेमातून अन प्रार्थनेतूनही. कारण जेथे प्रेम आहे, तेथे प्रार्थना आहे. म्हणूनच ज्याच्यावर आपलं प्रेम असतं त्याच्यात आपल्याला परमात्म्याची झलक

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

मिळते. परमात्म्याला पाहण्याची दृष्टी प्रेम देते. प्रेम हे ' त्याच्या' दर्शनाचे व्दार आहे. प्रेम समग्रतेवर जडतं. तेव्हा ' तो' समग्रतेत दिसतो. प्रेम सूर्यासारख आहे. व्यति गोठलेल्या बर्फासारखी आहे. प्रेमसुर्य बर्फ – पिडांना विरघळून टाकतो अन मागे जो उरतो तो असीम समुद्र आहे. प्रेमशोध हा परमात्म्याचा शोध आहे. त्यात 'स्व' संपतो, सर्व जन्माला येतं. निश्चितच मृत्यूत अन जन्मातही व्यथा आहे. म्हणूनच प्रेम दाट व्यथा आहे. मृत्यूची देखील अन प्रसुतीची देखील. प्रमोद, तुमच्या 'कवितेत' उमटलेल्या संकेतांनी मी अस्वस्थ झालो आहे की तुम्ही प्रेमाच्या व्यथेचा आनंद अनुभवू लागला आहात.

डॉ.प्रमोद पवार यांची दीर्घ कविता ही गर्भातील एक स्त्री भृण जगात येण्या अगोदर जगाला साद घालते व स्त्री शोषणाच्या मुळासी जाते. शेवटी जगात येण्या आगोदर आपल्या माता – पित्याकडून मला मारणार नसाल तरच मी जन्म घेते याची हमी घेते. या दीर्घ काव्यातून कवीने एक मुलभूत शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा मुलभूत शोध दुसरा कोणताही नसून स्त्री शोषणाचा आहे. या स्त्री शोषणाचे विविधांगी पदर कवीने आपल्या काव्यातून उलघडले आहे.

स्त्री शोषणाला समाजातील प्रचलित पुरुषसत्ताक व्यवस्था कारणीभूत आहे व या पुरुषसत्ताक व्यवस्थेला राज्यसंस्थेचे, धर्मसंस्थेचे, संस्कृतीचे व अर्थसत्तेचे समर्थन आहे. स्त्री जन्म नाकारण्याला व स्त्री शोषणाला आपली संस्कृती, धर्म, कसे कारणीभूत ठरले आहे. हे कवीने आपल्या दीर्घकाव्यातून उदाहरणासह स्पष्ट केले आहे. कवी केवळ स्त्री


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

जन्म नाकारणाऱ्या व शोषण करणाऱ्या कारणाचा शोध घेत नाही. तर स्त्री जन्माचे महत्त्व ही स्पष्ट करतात. स्त्री ही मानवी आस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. कवीने स्त्री शोषण थांबवण्याचे उपाय सांगून पुरुषप्रधान व्यवस्थेला बळी पडलेल्या महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

समकालीन काळ हा विज्ञानाची प्रगती साधणारा असला तरी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारत नाही. यामुळे स्त्री वरील हृदयद्रावक हल्ले होतांना दिसून येतात. असे हल्ले होत असले तरी कवीने निश्चित वेगळा विचार केला आहे व स्त्री जन्माचे स्वागत केले आहे.

## समारोप :

डॉ. प्रमोद पवार यांच्या सांगा, तुम्हीच सांगा .... या दीर्घ काव्यवर प्रमुख समीक्षकांच्या समीक्षेचा विचार केला तर स्पष्ट होते की फ.मुं. शिंदे यांनी आध्यत्मिक अनुषंगाने समीक्षा केली तर पी. विठ्ठल यांनी दीर्घ काव्याच्या रचने संदर्भात चर्चा केली आहे. श. ग. काळे यांनी लोकसंख्याशास्त्राचा आधार घेत सांगा तुम्हीच सांगा या दीर्घकाव्याचे विश्लेषण केले तर डॉ. राजेश यादव यांनी या काव्याचे तत्त्वज्ञानात्मक पैलू स्पष्ट केले. एकूण सर्वच समीक्षेचा विचार केला तर डॉ. प्रमोद पवार यांचे सांगा, तुम्हीच सांगा .... हे दीर्घ काव्य विविधांगी आहे. ते आध्यात्मा बरोबर तत्त्वज्ञानाची, स्त्री – पुरुष समानतेची, पुरुषप्रधान संस्कृतीचे विश्लेषण करते.

## References :

Pawar, Pramod Ambadasrao. *Saanga Tumhich Saanga*. Aurangabad: Sakshat Publications, 2013.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.